# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. १४ /२०२४

**विषय: उन्हाळी सत्र ( नियोजन एप्रिल/मे, २०२४) परीक्षांच्या आयोजनाबाबत.**

विद्यापीठ अधिकार मंडळांनी वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार सर्व विद्याशाखांतील सर्व अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष ते अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या **उन्हाळी** सत्र २०२४ (नियोजन **एप्रिल/मे, २०२४**) परीक्षांचे आयोजन पारंपारिक पध्दतीने (ऑफलाईन) करण्यात आलेले आहे. याबाबतची मार्गदर्शक तत्वे व सूचना खालीलप्रमाणे :

१. शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मधील **उन्हाळी** सत्र २०२४ पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या नियमित व अनुशेषित आवेदनपत्र भरलेल्या पात्र विद्यार्थ्यांच्या लेखी परीक्षांचे आयोजन टप्प्याटप्प्याने दिनांक १० एप्रिल,२०२४ पासून पारंपारिक (ऑफलाईन) पध्दतीने करण्यात आलेले आहे.

२. संबंधित परीक्षांची वेळापत्रके विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावर टप्प्याटप्प्याने प्रसिध्द करण्यात येतील. विद्यार्थ्यांनी वेळोवेळी वरील संकेतस्थळावरुन माहिती घ्यावी.

३. सर्व विद्याशाखेतील पदविका अभ्यासक्रमांच्या परीक्षा तसेच पारंपारिक अभ्यासक्रमातील पदवी स्तरावरील प्रथम वर्षाच्या (कला, वाणिज्य व विज्ञान) परीक्षा, विधी अभ्यासक्रम मधील पदवी स्तरावरील प्रथम वर्षाच्या (एलएलबी व बीएएलएलबी) परीक्षांचे आयोजन दिनांक १० एप्रिल, २०२४ पासून २५ एप्रिल, २०२४ पर्यंत महाविद्यालय स्तरावर करण्यात यावे. उपरोक्त नमूद परीक्षांचे वेळापत्रक तयार करणे, प्रश्नपत्रिका तयार करणे, प्रत्यक्ष परीक्षांचे आयोजन करणे, उत्तरपत्रिका तपासणे, विद्यापीठाने उपलब्ध करुन दिलेल्या संरक्षित अंतर्गत प्रणालीमध्ये गुण भरणे इ. सर्व कामे महाविद्यालय स्तरावर करण्यात यावीत.

४. सर्व विद्याशाखेतील पदविका अभ्यासक्रमांच्या परीक्षा तसेच पारंपारिक अभ्यासक्रमातील पदवी स्तरावरील प्रथम वर्षाच्या (कला, वाणिज्य व विज्ञान) अंतर्गत परीक्षांचे गुण, मौखिक परीक्षांचे गुण/प्रात्यक्षिक परीक्षांचे गुण तसेच लेखी परीक्षांचे गुण या सर्व कामांचे नियोजन दिनांक ५ मे, २०२४ अखेरपर्यंत करण्यात यावे. विधी अभ्यासक्रम मधील पदवी स्तरावरील प्रथम वर्षाच्या (एलएलबी व बीएएलएलबी) परीक्षांचे आयोजनाच्या कालावधीबाबतीत वेळोवेळी स्वतंत्र परिपत्रकाद्वारे अवगत करण्यात येईल.

५. पारंपारिक अभ्यासक्रमातील (कला, वाणिज्य, विज्ञान व विधी) पदवी स्तरातील प्रथम वर्ष वगळून तसेच पदव्युत्तर स्तरातील अभ्यासक्रमांची सर्व वर्ष, व्यावसायिक अभ्यासक्रमांची पदवी व पदव्युत्तर स्तरातील सर्व वर्षांच्या परीक्षांचे आयोजन विद्यापीठ स्तरावर करण्यात येईल.

६. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व विद्याशाखेतील पदविका अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे मूल्यमापन तसेच पारंपारिक अभ्यासक्रमातील पदवी स्तरावरील प्रथम वर्ष (कला, वाणिज्य व विज्ञान) परीक्षांचे मूल्यमापन करणेकरिता तसेच विधी अभ्यासक्रमातील (एलएलबी व बीएएलएलबी) पदवीचे प्रथम वर्षातील परीक्षांचे मूल्यमापन करणेकरिता संबंधित महाविद्यालय हे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम, ४८ (१) (च) नुसार केंद्रिय मूल्यमापन प्रकल्प केंद्र (कॅप) म्हणून मान्यता

देण्यात येत आहे. संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक हे त्या केंद्रिय मूल्यमापन प्रकल्प केंद्राचे (कॅप) संचालक म्हणून कामकाज पाहतील.

७. पारंपारिक अभ्यासक्रमाचे पदवी स्तरातील अंतिमपूर्व ते अंतिम वर्ष (कला, वाणिज्य व विज्ञान) तसेच विधी अभ्यासक्रमातील (एलएलबी) पदवीचे अंतिमपुर्व वर्ष ते अंतिम वर्ष आणि (बीएएलएलबी) पदवीचे दुसरे, तिसरे, चौथे व अंतिम वर्ष परीक्षांचे मूल्यमापन करणेकरिता व पदव्युत्तर स्तरातील अभ्यासक्रमांची सर्व वर्ष, व्यावसायिक अभ्यासक्रमांची पदवी व पदव्युत्तर स्तरातील सर्व वर्षांच्या परीक्षांचे मूल्यमापन स्तरीय केंद्रिय मूल्यमापन प्रकल्प पध्दतीने विद्यापीठ स्तरावर करण्यात येईल. तसेच या अभ्यासक्रमांच्या केंद्रिय मूल्यमापन केंद्राबाबत परीक्षा विभागामार्फत स्वंतत्रपणे अवगत करण्यात येईल.

८. उन्हाळी २०२४ परीक्षांकरिता महाविद्यालयांकडून विविध सत्रांच्या अंतर्गत गुण स्विकारण्याच्या प्रणालीमध्ये बदल करण्यात येत असून परीक्षा विभागाद्वारे सुरक्षित व संरक्षित सर्व तपशीलासह एक्सेल शीट उपलब्ध करून देण्यात येत असुन त्यामध्येच अंतर्गत गुणांची नोंदणी करून सदर एक्सेल शीट अंतर्गत गुणप्रणालीमध्ये अपलोड करण्यात यावी. याबाबतचे स्वतंत्र ऑनलाईन अंतर्गत गुण प्रणालीचे सादरीकरण करण्यात येईल याची सर्व महाविद्यालय परीक्षा अधिकारी यांनी नोंद घ्यावी.

९. परिपत्रक क्र. १२५ अंतर्गत येणा—या अभ्यासक्रमांच्या परीक्षेचे नियोजन महाविद्यालय स्तरावर विद्यापीठाच्या परीक्षांच्या नियोजनाच्या धर्तीवर करण्यात यावे. याबाबत **परीक्षकांची यादी व वेळापत्रक एक महिना अगोदर विहीत मुदतीत परीक्षा विभागाकडे सादर करुन पूर्व मान्यता घेऊनच कार्यवाही करावी.**

१०. प्रथम वर्ष ते अंतिम वर्ष विद्यार्थ्यांच्या २०२४ या उन्हाळी सत्रातील जुन्या नियमित व बहि:स्थ अभ्यासक्रमांच्या परीक्षा या समकक्ष विषयानुसार आयोजित करण्यात आलेल्या आहेत. विद्यार्थ्यांनी विद्यापीठ संकेतस्थळावर अभ्यासक्रम अंतर्गत जाहीर करण्यात आलेले समकक्ष विषयांची समग्र माहिती घेऊन त्याप्रमाणे परीक्षा द्यावी.

११. संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक यांनी परीक्षार्थीच्या बैठक व्यवस्थेचे नियोजन नियमानुसार करावे. तसेच आवश्यकतेनुसार हवा व उजेड यासाठी पंखा तसेच विजेची पुरेशी व्यवस्था करण्यात यावी.

१२. काही महाविद्यालयांमध्ये जर आवश्यक बैठक व्यवस्थेकरिता बेंच उपलब्ध नसतील तर संबंधित प्राचार्यांनी तात्पुरत्या व्यवस्थेची सोय करावी. तसेच विद्यापीठ नियमाप्रमाणे बैठक व्यवस्था करण्याची जबाबदारी संपूर्णपणे महाविद्यालयाचे प्राचार्य/संस्थेचे संचालक तथा महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांची राहील.

१३. परीक्षा केंद्रावर आवश्यकतेनुसार पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विद्यार्थ्यांची पिशवी ठेवण्याची व्यवस्था करण्यात यावी तसेच विद्यार्थ्यांनी कोणत्याही परिस्थितीमध्ये मोबाईल/इलेक्ट्रॉनिक उपकरणे परीक्षा कक्षामध्ये आणू नयेत हे पूर्णपणे नियमबाहय व आक्षेपार्ह आहे. मोबाईल/उपकरणे हरविल्यास /चोरी गेल्यास/गहाळ झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची असेल. याबाबत संबंधित महाविद्यालयातील परीक्षा अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

१४. दिव्यांग विद्यार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे सोयी व सवलती देय राहतील. तसेच या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी प्रति तास २० मिनिटे अधिकचा वेळ देय राहील. दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता तळमजल्यावर विशेष खोलीची व्यवस्था करण्यात यावी. तसेच आवश्यकतेनुसार त्यांना लेखनिक व इतर सर्व सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात यावेत.

१५. विद्यार्थ्यांनी परीक्षा सुरु होण्यापूर्वी अर्धा तास अगोदर परीक्षा केंद्रावर हजर राहणे अनिवार्य आहे. याबाबतच्या पूर्वसूचना संबंधित महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

१६. काही कारणामुळे विद्यार्थ्यांचे बारकोड संबंधित परीक्षा केंद्रास प्राप्त झालेले नसतील तर त्यांना इमर्जन्सी बारकोड देऊन परीक्षा देण्याची व्यवस्था करण्यात यावी. परीक्षा अर्ज न भरलेल्या विद्यार्थ्यांना इर्मजन्सी बारकोडवरुन परीक्षेस बसविणे हा दखलपात्र गुन्हा असून त्याबाबत संबंधितावर कारवाई होऊ शकते याची नोंद कृपया घ्यावी. याबाबत संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांनी विशेष दक्षता घ्यावी.

१७. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार विद्यापीठ परीक्षा व परिपत्रक १०४/२०२२ नुसार नमूद परीक्षा एकाच दिवशी एकाच वेळी येत असल्यास परिपत्रकातील पात्र नमूद कारणाकरिता विशेष परीक्षांचे आयोजन परिपत्रक क्र. १०४ व ३९ अन्वये कार्यवाही करण्यात येईल. सदर विशेष परीक्षांची नियमावली इन–सेम परीक्षेस लागू असणार नाही कृपया याची नोंद घ्यावी.

१८. केंद्रिय मूल्यमापन प्रकल्प केंद्र (कॅप) प्राचार्य /संचालक यांना कळविण्यात येते की, परीक्षेच्या प्रारंभापासून तिस–या दिवशी केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प सुरू करण्यात यावेत. याबाबतची सूचनावलीचे पत्र स्वतंत्रपणे परीक्षा–छाननी व तालिनीकरण कक्षामार्फत पाठविण्यात येईल.

१९. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार उन्हाळी सत्र, २०२४ (नियोजन एप्रिल/मे,२०२४) आयोजन करण्यासाठी संबंधित महाविद्यालयास परीक्षा केंद्र म्हणून तात्पुरती मान्यता देण्यात येत आहे. केवळ नवीन महाविद्यालयांनी सादर केलेल्या परीक्षा केंद्राच्या प्रस्तावाबाबत परीक्षा विभागाद्वारे नियुक्त समिती भेट देईल व समितीने सादर केलेल्या अहवालावर परीक्षा व मूल्यमापन मंडळाने दिलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

२०. ज्या महाविद्यालयांमध्ये सबळ/सक्षम व स्वीकृत होईल अशा कारणांमुळे परीक्षा आयोजन करणे शक्य नसेल अशा महाविद्यालयांनी जवळच्या महाविद्यालयात परीक्षा आयोजनाबाबतचा पत्रव्यवहार विनाविलंब परीक्षा विभागाकडे सादर करण्यात यावा. प्रस्ताव सादर करताना दुस–या महाविद्यालयाचे "ना–हरकत प्रमाणपत्र" जोडण्यात यावे.

२१. ज्या प्राध्यापकांना भरारी सदस्य पथक/वरिष्ठ बाहय पर्यवेक्षक /स्थायी निरीक्षक परीक्षा आयोजनाबाबत परीक्षा विभागाकडून वेळोवेळी आदेश प्राप्त होतील त्यांनी संबंधित काम करणे हे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ४८ (४) नुसार बंधनकारक आहे. संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी अशा अध्यापकांना /प्राध्यापकांना नमूद कालावधीकरीता तात्काळ कार्यमुक्त करावे.

२२. सदर परीक्षा सुरळीतपणे पूर्ण करण्यासाठी विद्यापीठाने सर्वतोपरी दक्षता घेतली असून त्याकरिता सर्व उपाययोजना केलेल्या आहेत. याकरिता सर्व संबंधितांना सूचना देण्यात आलेल्या असून दक्षता/भरारी पथके यांची नियुक्ती केलेली आहे.

२३. सदर परीक्षेवेळी संबंधित परीक्षा केंद्रांना योग्य वेळी ऑनलाईन पध्दतीने प्रश्नपत्रिका प्राप्त झाली नाही तर ०२०–२५६२१४५३ या दूरध्वनी क्रमांकावर तात्काळ संपर्क साधावा.

२४. प्राचार्य/महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांना कळविण्यात येते की, त्यांनी आपले मोबाईल क्रमांक परीक्षा कामकाजाकरिता अद्ययावत करावेत. तसेच परीक्षा अधिकारी यांची नेमणूक दिनांक १० एप्रिल, २०२४ पूर्वी करण्यात यावी.

२५. जर संबंधित परीक्षा केंद्रांना परीक्षा आयोजन करण्यासाठी उत्तरपत्रिका व इतर आवश्यक साधनसामुग्री प्राप्त झाली नसल्यास त्यांनी (०२०)२५६२१४६०/१४६२ या क्रमांकावर संपर्क साधून परीक्षा गोदाम कक्षातून आवश्यक साधनसामुग्री घेऊन जाण्याची व्यवस्था करावी.

२६. सदर परीक्षेदरम्यान विद्यार्थ्याने गैरप्रकार केल्याचे आढळून आल्यास सदर विद्यार्थी हा विद्यापीठ अध्यादेश क्र. ०९ नुसार कारवाईस पात्र असेल. तसेच वेळोवेळी केंद्र शासन व राज्य शासन यांनी निर्गमित केलेले कायदे (IT Act 2016) नुसार गैरप्रकार करणारे विद्यार्थी कारवाईस पात्र असतील.

२७. मा. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार उन्हाळी सत्र, २०२४ (नियोजन एप्रिल/मे,२०२४) पारंपारिक (ऑफलाईन) पध्दतीने आयोजन करण्यात आलेल्या परीक्षासाठी छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकनाची सुविधा लागू राहील (सुधारीत अध्यादेश क्र. १८४ अ व ब नुसार). पदविका अभ्यासक्रम परीक्षांचे व प्रथम वर्ष (कला, वाणिज्य, विज्ञान व विधी) परीक्षांचे छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकन संबंधित महाविद्यालयाच्या स्तरावर करण्यात यावे. याबाबत विद्यार्थ्यांना संबंधित विभागामार्फत स्वतंत्र पत्राद्वारे कळविण्यात येईल.

२८. पारंपारिक अभ्यासक्रमाचे पदवी स्तरातील प्रथम वर्ष (कला, वाणिज्य, विज्ञान व विधी) परीक्षांचे आयोजन करताना महाविद्यालयाच्या स्वत:च्या उत्तरपत्रिकांचा वापर करावा या परीक्षांचे आयोजन करताना विद्यापीठाच्या उत्तरपत्रिकांचा वापर करू नये तसेच याबाबतीत आवश्यक सर्व गोपनियता व सुरक्षिततेची दक्षता घेण्यात यावी.

२९. परीक्षा गोदाम कक्षाकडून निर्गमित करण्यात आलेल्या पत्र क्रमांक २९ दि. १६/२/२०२४ अन्वये सदर परीक्षेकरिता पुरवणी सुविधा लागु नसुन पुरवणी सुविधा बंद करण्यात आलेली आहे. याची कृपया मा. प्राचार्य/महाविद्यालय परीक्षा अधिकारी यांनी नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी.

मा. प्राचार्य/ संचालक/महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, वरील मार्गदर्शक तत्वे व सूचनांचे अवलोकन करुन याबाबत आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरुन सूचित करावे व त्यांच्या शंकांचे निरसन करुन विद्यापीठास सहकार्य करावे.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा—समन्वय/ ९८
दिनांक :— १२ मार्च, २०२४

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा.